# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०४/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

## हरीयाणा येथील पलवल शहर येथे खंडणी प्रकरणी ८० राउंड फायर करून दहशत पसरविणाऱ्या ०५ अट्टल आरोपींना नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

दि. ०१/०४/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. दरम्यान मा. नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार व मा. श्री. अनिल म्हस्के सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांना पलवल हरीयाना येथील पोलीसांनी माहिती दिली की, पलवल येथे दोन दिवसा पूर्वी अप क्र. १५५/२४ कलम १४८, १४९, २८५, ३०७, ४२७, ४५२, १२० ब भा.द.वि. सहकलम ३/२५ शस्त्र अधि. मधील **आरोपी नामे १) भगतसिंग तेवतीया वय २६ वर्षे २) रविन्द्र सुरजमल दागर वय २४ वर्षे ३) नरेन्द्र उर्फ बिंदर राजेन्द्र तेवत्तीया, वय २५ वर्षे, ४) सलमान शेरदिन खान, वय १९ वर्षे, रा. छपरोला, ता. जि. पलवल (हरीयाना) ५) गौरव शिवसिंग तेवतीया, वय १९ वर्षे, सर्व रा. छपरोला, ता. जि. पलवल (हरीयाना)** हे स्लिपर ट्रॅव्हल्स क्र. CG-08/AW-8810 मध्ये छत्तीसगढ रायपूर येथुन बसले आहे व ते मौदा नागपूर रोडने जात आहे. आणि सदर आरोपितांनी पलवल येथे ९९९ मोबाईल शॉपी समोर एक करोड ची फिरौती घेवुन रायफलने एकूण ८० राउन्ड फायर केले आहे. अशा माहिती वरून मा. नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार व मा. श्री. अनिल म्हस्के सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांनी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस स्टेशन मौदा व स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांना तात्काळ आरोपी ताब्यात घेण्याकरीता रवाना केले. यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपुत यांनी सदर घटनेची गंभीर दखल घेवून तात्काळ पोलीस ठाणे मौदा येथील दुय्यम अधिकारी सपोनि मनोज चौधरी, पोउपनि महेश बोथले तसेच पोलीस ठाण्यात उपलब्ध पोलीस स्टाफ यांना सोबत घेवून माथनी येथे अपेक्षा हॉटेल समोर सापळा रचुन स्लिपर ट्रॅव्हल्स क्र. CG-08/AW-8810 थांबवुन स्लिपर ट्रॅव्हल्स मध्ये प्रवास करीत असलेल्या प्रवाशांना कुठल्याच प्रकारची हानी न होवू देता मोठ्या शिताफीने पलवल हरीयाना येथील गुन्ह्यातील वर नमूद पाचही आरोपितांना ताब्यात घेतले सदर ठिकाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी हजर होवुन आरोपितांना सविस्तर विचारपूस केली असता आरोपितांनी गुन्ह्याची कबुली दिल्याने पाचही आरोपितांना पुढील कायदेशीर कारवाई करीता पलवल हरियाना पोलीस स्टाफचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण नागपूर मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री अनिल मस्के, सहायक पोलीसअधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, मा. श्री. डॉ. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग कार्यालय कन्हान यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपुत पोलीस ठाणे मौदा, सपोनि मनोज चौधरी, पोउपनि बट्टुलाल पांडे, पोउपनि आशिष मोरखडे, पोउपनि महेश बोथले, पोहवा रोशन काळे, इक्बाल शेख, विनोद काळे, प्रमोद भोयर, रोहन डाखोरे, अमृत किनगे, मिलींद नांदुरकर, तसेच पोलीस ठाणे मौदा येथील पोलीस स्टाफ यांनी केली असून संपूर्ण जिल्ह्यात मौदा पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीचे कौतुक होत आहे.

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पोस्टे भिवापूर :– अंतर्गत मज्जिद जवळ नांद ता. भिवापुर येथे दिनांक ३१/०४/२०२४ चे २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. शिलाबाई राजु चाचेरकर वय ४० वर्ष, रा. मज्जिद जवळ नांद ता. भिवापुर नागपुर याला **आरोपी नामे– किशोर काशीराम चाचेरकर, वय ३४ वर्ष, रा. नांद ता. भिवापुर जि. नागपुर** याने धक्का दिल्याने त्यांच्यात तोंडातोंडी सुरू असता जखमी हा त्यांच्यातील झगडा भांडण सोडविण्याकरिता गेला असता आरोपीने जखमीचे कॉलर पकडुन त्याला जिवाने ठार मारण्याच्या उद्देशाने आरोपीने त्याचे जवळील चाकुने जखमीचे कुशीत मारून गंभीर जखमी केले.

या प्रकारची माहिती पोलीस स्टेशन ला मिळताच आरोपीच्या शोधकामी पथक तयार करून रवाना केले. सदर आरोपी आपल्या घरी असल्याची माहिती मिळाली त्यावरून पथकाने आरोपी **आरोपी नामे– किशोर काशीराम चाचेरकर** यास ताब्यात घेवुन पुढील कार्यवाही करीता पोस्टे येथे आणले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे भिवापूर येथे आरोपीविरूद्ध कलम ३०७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास परि. पोलीस उपनिरीक्षक किरण महागावे मो. नं. ८४४६९८३६४१ या करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पास्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि. श्री. जयप्रकाश निर्मल, सफौ. यादव, पोहवा राकेश त्रिपाठी, किशोर ठाकुर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर